**ठळक बातम्या**

- भारत आणि श्रीलंका यांच्यात ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

- स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची स्वाक्षरी

- देशाच्या वायव्य भागात उष्णतेच्या लाटेचा तर दक्षिण भागात मुसळधार पावसाचा इशारा

**आणि**

- अभिनेता मनोजकुमार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका दौऱ्यात आज दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य अशा एकूण सात महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात प्रतिनिधिमंडळ स्तरावर चर्चा झाल्यांनतर केलेल्या संयुक्त निवेदनात दोन्ही नेत्यांनी आपली भूमिका मांडली प्रधानमंत्री मोदी म्हणाले.....

**होल्ड बाईट प्रधानमंत्री**

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना “श्रीलंका मित्र विभूषण” हा श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारताच्या ‘शेजारी देशांना प्राधान्य’ धोरणात आणि व्हिजन महासागर संकल्पात श्रीलंकेला विशेष स्थान असल्याचं

सांगून प्रधानमंत्र्यांनी श्रीलंकेची वाटचाल प्रगतीपथाकडे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. शेजारी देशांची सुरक्षितता एकमेकांच्या सहकार्यावर अवलंबून असल्यानं भारत - संयुक्त अरब अमिरात आणि श्रीलंका यांच्यात सुरक्षा करार महत्त्वाचा आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. भारत आणि श्रीलंकेतल्या मच्छिमारांच्या प्रश्नाबद्दल मानवतावादी दृष्टिकोनानं तोडगा काढण्यावर सहमती झाल्याचंही त्यांनी सांगितलं. भविष्यात दोन्ही देशांमधली भागीदारी नव्या उंचीवर नेण्यासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. श्रीलंकेतल्या काही मंदिरांच्या निर्मितीसाठी भारत सहकार्य करेल, असं ते म्हणाले. श्रीलंकेत आर्थिक सुधारणांसाठी सहाय्य केल्याबद्दल श्रीलंकेच्या अध्यक्षांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले. भारताच्या सहकार्यानं श्रीलंकेत सुरु असलेल्या अनेक विकासकामांचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

<><><><><><>

रामनवमी निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या तामिळनाडूला भेट देणार असून रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या नवीन पांबन रेल्वे पुलाचं उद्घाटन करणार आहेत. आकाशवाणीवरून या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असल्यानं आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र उद्या दुपारी एक वाजून पाच मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><><><>

बासष्टाव्या राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज नवी दिल्लीत सागरी जनजागृती वॉकेथॉनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. भारताच्या नौवहन क्षेत्राला समृद्ध इतिहास असून हे क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा एक आधारस्तंभ आहे, देशाला

जगातली सामर्थ्यशाली सागरी सत्ता बनवण्यात युवावर्ग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असं सोनोवाल यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय सागरी दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताच्या समृद्ध सागरी इतिहासाचं स्मरण केलं आहे. केंद्र सरकार नौवहन क्षेत्राला आणि देशातल्या बंदरांना अधिक मजबूत करण्यासाठी निरंतर प्रयत्न करत राहील, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारित विकासात भारत जागतिक नेता म्हणून उदयास येईल असं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं कालपासून स्टार्टअप महाकुंभ कार्यक्रमाच्या दुसऱ्या आवृत्तीला सुरूवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. भारतीय तरूण जग काबीज करण्यास उत्सुक आणि सज्ज असल्याचं ते म्हणाले. या आवृत्तीत ३ हजारांहून अधिक स्टार्टअप्स, एक हजाराहून अधिक गुंतवणूकदार आणि व्यवसाय विकास संस्था आणि ५० हून अधिक देशांतील सुमारे दहा हजार प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

**<><><><><><>**

माजी उपप्रधानमंत्री बाबू जगजीवनराम यांच्या जयंतीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे. वंचित आणि शोषितांच्या कल्याणासाठी बाबू जगजीवनराम यांनी दिलेला अविरत लढा प्रेरणादायी असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर लिहीलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वक्षरी केली आहे. परदेशी नागरिकांचा भारत प्रवेश, वास्तव्य आणि

स्थलांतर याविषयीचे नियम या विधेयकात आहेत. यापूर्वीचे पारपत्र कायदा १९२०, परदेशी नागरिक नोंदणी कायदा १९३९, तसंच परदेशी नागरिक कायदा १९४६ आणि भारतात स्थलांतर कायदा २००० हे ब्रिटीशकालीन कायदे या नव्या कायद्याने मोडीत काढले आहेत. गेल्या आठवड्यात संसदेने हे विधेयक मंजूर केलं.

नवीन कायद्यानुसार बनावट पारपत्र वापरणं किंवा पुरवणं या गुन्ह्यांकरता ७ वर्षं पर्यंत कैद आणि १० लाख रुपयेपर्यंत  दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात चेन्नईमध्ये दुपारी साडेतीन वाजता सामना होणार आहे. तर चंदीगढमध्ये राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्स यांच्यात संध्याकाळी ७ वाजता सामना होईल.

दरम्यान काल लखनौ सुपर जायंट्सनं मुंबई इंडियन्सचा १२ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या लखनौ सुपर जायन्ट्सनं सलामीवीर मिचेल मार्श आणि एडेन मार्कराम यांच्या अर्धशतकांच्या जोरावर निर्धारित २० षटकांत आठ गडी गमावून २०३ धावा केल्या. मुंबई इंडियन्सकडून सूर्यकुमार यादवनं ४३ चेंडूत ६७ धावा केल्या.  मात्र मुंबई इंडियन्सला निर्धारित २० षटकांत ५ बाद १९१ धावा करता आल्या. दिग्वेशला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**<><><><><><>**

ब्राझीलमध्ये सुरु मुष्टियुद्ध विश्वचषक स्पर्धेत भारताच्या अभिनाश जामवालनं पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं काल इटलीच्या जियानलुइगी मलंगाचा ५-० असा पराभव केला. जामवालचा अंतिम फेरीचा सामना आज ब्राझीलच्या युरी रीसशी होणार आहे.

तर, ७० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात भारताच्या हितेशची लढत इंग्लंडच्या ओडेल कामाराशी होईल. हितेशने फ्रान्सच्या माकन त्राओरेवर ५-० असा शानदार विजय मिळवला होता.

यापूर्वी, मनीष राठोडने ५५ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकलं आहे.

<><><><><>

प्रख्यात चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक मनोज कुमार यांच्या पार्थिवावर आज मुंबईच्या पवन हंस स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अभिनेता अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, प्रेम चोप्रा, सलीम खान, रझा मुराद, राजपाल यादव, दिग्दर्शक सुभाष घई यांच्यासह मनोरंजनविश्वातले मान्यवर यावेळी उपस्थित होते. मनोज कुमार यांचं काल पहाटे खासगी रुग्णालयात वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झालं. देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे मनोज कुमार हे भारत कुमार या टोपणनावानेही ओळखले जात. वो कौन थी, शहीद, उपकार, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानासाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार, पद्मश्री पुरस्कार तसंच दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं पुढचे चार ते पाच दिवस भारताच्या वायव्य भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. कोकण आणि गोव्यात ९ एप्रिल पर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. या महिन्याच्या ९ तारखेपर्यंत दिल्ली, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, पंजाब आणि गुजरातमध्ये उष्णतेच्या लाटेची परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. दरम्यान आज ओडिशा, ईशान्य भारत, अंदमान आणि निकोबार बेटांवर मेघगर्जनेसह पाऊस तर केरळ,

माहे, तामिळनाडू, कर्नाटक, आसाम आणि मेघालयात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मुंबईत काल धुळीचं वादळ आलं. धुळीच्या वादळाचा शहरातल्या वाहतूक आणि रेल्वे सेवांवर परिणाम झाला. दरम्यान, भारतीय हवामान विभागानं आज राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा इशारा जारी केला आहे.

**//<><><><><><>//**